# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः28.12.2024** **वारःशनिवार**

---

**ठळक बातम्या**

• माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहनसिंग यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी नवी दिल्लीत अंत्यसंस्कार होणार, स्मारकासाठी जागा देण्याचं गृहमंत्रालयाचं आश्वासन
• डॉक्टर मनमोहन सिंग यांना जगभरातून श्रद्धांजली अर्पण
• पंतप्रधान नरेंद्र मोदी आकाशवाणीवरुन उद्या करणार मन की बात
• जर्मनीमध्ये सार्वत्रिक निवडणुकीचा मार्ग मोकळा,

आणि

• देशभरात हवामानात अनपेक्षित बदलांची नोंद, जम्मूकाश्मिरमध्ये बर्फवृष्टी तर देशाच्या बहुतांश भागात पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

**मनमोहन सिंग**

माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी नवी दिल्लीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. तत्पुर्वी दिल्लीच्या काँग्रेसभवन इथून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात येईल. सिंग यांचं गुरूवारी रात्री वृद्धापकाळानं निधन झालं.
राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल डॉक्टर सिंग यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचं अंत्यदर्शन घेतलं. शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रात सहजतेनं काम केलेल्या विरळा व्यक्तिमत्वांपैकी डॉक्टर सिंग एक होते असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. तर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी देशाच्या विकास आणि समृद्धीचे नवे मार्ग खुले करणारे अर्थमंत्री म्हणून डॉक्टर मनमोहन सिंग ओळखले जातात असं सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, डॉ. मनमोहन सिंग हे प्रामाणिक व्यक्ती, महान अर्थशास्त्रज्ञ आणि आर्थिक सुधारणा घडवणारे नेते म्हणून स्मरणात राहातील असं आपल्या शोकसंदेशात सांगितलं. अफाट बुद्धिमत्ता आणि प्रामाणिकपणे देशाचं नेतृत्व करणारे डॉ. सिंग गुरू आणि मार्गदर्शक होते, ते लाखो लोकांच्या स्मरणात राहातील अशा शब्दांत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. तर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी दूरदर्शी, निष्कलंक आणि प्रामाणिक नेता आणि अतुलनीय अर्थतज्ज्ञ गमावल्याची खंत व्यक्त केली. केंद्रीय मंत्रिमंडळ आणि, काँग्रेस कार्यकारिणीनं डॉक्टर सिंग यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मंजूर केला. देशात सात दिवसांचा राजकीय दुखवटाही जाहीर करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी उत्तम प्रशासक अशा शब्दांत डॉक्टर मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहिली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही डॉ. सिंग यांना श्रद्धांजली वाहिली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघानंही डॉक्टर सिंग यांना श्रद्धांजली अर्पण करुन शोक व्यक्त केला आहे. जागतिक पातळीवरही सिंग यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अफगाणिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष हमीद करझाई यांनी अफगाणिस्तानच्या लोकांचे ते मित्र होते, भारतानं नामांकित पुत्र गमावला असल्याचं शोकसंदेशात म्हटलं आहे. मालदिव्जचे माजी राष्ट्राध्यक्ष मोहम्मद नाशिद यांनी सिंग यांचं उदार पितृतुल्य व्यक्तिमत्व असल्याचं सांगून त्यांच्यासमवेत काम करण्यात आनंद मिळायचा असं नमूद केलं आहे. नेपाळमधूनही पंतप्रधान केपी शर्मा ओली, माजी राष्ट्रपती विद्यादेवी भंडारी यांनी आपले शोकसंदेश पाठवले आहेत. तसंच, भारतातले रशियाचे राजदूत डेनिस अलिपोव यांनी भारत -रशिया संबंध मजबूत करण्यात सिंग यांनी मोठी भूमिका बजावल्याचं म्हटलं आहे.

**सिंगस्मारक**

दरम्यान, डॉ सिंग यांचं यथोचित स्मारक बांधण्यासाठी सरकार जागा देऊ करणार असल्याचं केंद्रीय गृह मंत्रालयानं म्हटलं आहे. स्मारकासाठी जागा देण्याची विनंती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी काल सरकारकडे केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर लगेचच गृहमंत्री अमित शहा यांनी सिंग यांच्या कुटुंबियांशी संवाद साधून त्यांना ही माहिती दिली.

**थेट-प्रसारण**

माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांच्या पार्थिव देहावर आज शासकीय इतमामात नवी दिल्ली इथं अंत्यसंस्कार होणार आहेत. या अंतिम यात्रेचं थेट प्रसारण आकाशवाणी दिल्ली केंद्रावरुन करण्यात येणार आहे. एफ एम रेन्बो, इंद्रप्रस्थ, आकाशवाणी न्युज यांसह सर्व प्रमुख वाहिन्या आणि स्थानिक वाहिन्यांवरुन सकाळी 11 वाजल्यापासून हे प्रसारण सहक्षेपित करण्यात येईल.

**मन-की-बात**

पंतप्रधान नरेंद्र नोदी आकाशवाणीवरील मन की बातच्या  माध्यमातून उद्या देश विदेशातील नागरिकांशी संवाद साधणार आहेत. या मासिक कार्यक्रमाचा हा 117 वा भाग आहे. आकाशवाणी आणि दुरदर्शनच्या सर्व वाहिन्या, न्युजऑनएआयआर  ॲप तसंच एअर न्युज, दुरदर्शन आणि पंतप्रधान कार्यालयाच्या युट्युब वाहिनीवरुन हा कार्यक्रम थेट प्रसारित केला जाईल. त्यानंतर लगेचच प्रादेशिक भाषांमधून हा कार्यक्रम प्रसारित होईल.

**द.कोरिया**

दक्षिण कोरियाचे हंगामी राष्ट्राध्यक्ष चोई संग मोक यांनी देशात सद्यस्थितीत असलेल्या राजकीय अशांततेच्या पार्श्वभुमीवर आर्थिक व्यवहार स्थिर ठेवण्यावर भर देणार असल्याचं म्हटलं आहे. तत्पुर्वी, दक्षिण कोरियाच्या संसदेनं काळजीवाहू हान डक सू यांच्यावर पदभार स्वीकारल्यानंतर दोन आठवड्यांच्या आत लष्करी कायदा लागू केल्याबद्दल महाभियोग चालवण्यात आला.

**जर्मनी निवडणुका**

पंतप्रधान ओलाफ शोल्झ याच्या सरकारनं विश्वासमत गमावल्यानंतर  जर्मनीचे राष्ट्राध्यक्ष फ्रॅंक वॉल्टर स्टिनमिर यांनी काल कनिष्ठ सभागृह विसर्जित करत असल्याची घोषणा केली. यामुळे जर्मनीत आता निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. 23 फेब्रुवारीला निवडणूक होऊ शकणार आहे.

**अमेरिका व्हीसा**

भारतातल्या अमेरिकेचं दुतावास आणि वाणिज्य दुतावासाने सलग दुसऱ्या वर्षी दहा लाखांहून स्थलांतरेतर व्हिसा जारी करून एक नवीन विक्रम नोंदवला आहे. अमेरिकनं जारी केलेल्या निवेदनात, गेल्या चार वर्षात भारतातून अमेरिकेत येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत पाच पटीनं वाढ झाल्याचं म्हटलं आहे. या वर्षाच्या पहिल्या अकरा महिन्यात 20 लाखाहून अधिक भारतीयांनी अमेरिकेची वारी केली असल्याचंही दुतावासानं म्हटलं आहे.

**MPCE**

गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत 2023-24 या आर्थिक वर्षात मासिक दरडोई खर्च अर्थात MPCE, ग्रामीण भागात नऊ टक्के आणि शहरी भागात सुमारे आठ टक्क्यांनी वाढला आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने जारी केलेल्या घरगुती खर्च सर्वेक्षणाद्वारे ही आकडेवारीनुसार, समोर आली आहे. या सर्वक्षणासाठी 2 लाख 6 हजार घरगुती खर्चाची आकडेवारी तपासण्यात आली. ग्रामीण आणि शहरी कुटुंबांच्या खाद्यपदार्थांमध्ये शीतपेये, अल्पोपहार आणि प्रक्रिया केलेले अन्नपदार्थांचा मोठा वाटा आहे.

**BPSC**

बिहार लोकसेवा आयोगाकडून नियोजित असलेली 70 वी संयुक्त प्राथमिक स्पर्धा परिक्षा रद्द केली जाणार नसल्याचं BPSC चं परिक्षा नियंत्रक राजेश कुमार यांनी काल स्पष्ट केलं. ही पुर्नपरिक्षा येत्या 4 जानेवारी रोजी नियोजित आहे. गेल्या 13 डिसेंबर रोजी झालेल्या परिक्षेत अनियमितता झाल्याचा आरोप करत काही विद्यार्थी आंदोलन करत आहेत. या पार्श्वभूमीवर हे स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. यापुर्वी झालेल्या परिक्षेसाठी 3 लाख 28 हजार उमेदवार परीक्षार्थी होते. कोणताही पुरावा नसताना, परिक्षेत गैरव्यवहार झाल्याचा

कपोलकल्पित आरोप करत यातील केवळ 2 हजार विद्यार्थी आंदोलन करत आहेत. आयोग काही आंदोलकांसाठी परीक्षा लांबणीवर टाकण्याचा किंवा रद्द करण्याचा धोका पत्करू शकत नाही.

**दिल्ली प्रदुषण**
दिल्लीत काल दिवसभर झालेल्या पावसामुळे प्रदुषणाच्या पातळीत घट झाली आहे.

**मुंबई हवा प्रदुषण**
महाराष्ट्रात मुंबईतही वायू प्रदुषणाचा सामना करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेनं कठोर नियम आणि सर्वसमावेशक कृती योजना लागू केली आहे.

**किंग्ज कप बँडमिंटन**
किंग्ज कप आंतरराष्ट्रीय बँडमिंटन खुल्या स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेनने हाँगकाँगच्या अन्गुस ना का लोंग यांचा पराभव करत उपांत्य फेरीत धडक मारली.12 व्या मानांकित भारतीय खेळाडून लोंगचा 10-21, 21-13,21-13 असा पराभव केला.

**हॉकी इंडिया**
भारतीय हॉकी संघाच्या साखळी सामन्यांना ओडिशामध्ये आज सुरुवात होणार आहे. आरंभिक सामन्यांमध्ये आज दिल्ली एसजी पायपर्सचा सामना गोनासिका संघाशी होईल. हा स्पर्धा दोन टप्प्यात खेळवल्या जाणार आहे. साखळी फेरीचा अंतिम सामना येत्या 1 फेब्रुवारी रोजी होणार आहे.

**महिला क्रिकेट**
भारत आणि वेस्ट इंडिज यांच्या महिला क्रिकेट संघांमध्ये काल वडोदरा इथं झालेल्या सामन्यात भारतीय संघानं वेस्ट इंडिजवर 5 गडी राखून विजय मिळवला. मर्यादित 50 षटकांच्या तीन सामन्यांची ही मालिका भारतानं 3-0 अशी जिंकली. कालच्या सामन्यात दीप्ती शर्मानं 31 धावात 6 फलंदाजांना बाद करत वेस्ट इंडिजचा डाव 162 धावांवर रोखला. यजमान भारतीय महिला संघानं 163 धावांचं हे आव्हान 29 व्या षटकातच पार केलं.

**श्रीनगर हिमवर्षाव**
जम्मूकाश्मिरमध्ये थंडीचा कडाका वाढला असून, काल विविध भागात बर्फवृष्टी झाली. श्रीनगर जम्मू राष्ट्रीय महामार्गावरील दोन्ही बाजूंची वाहातूक बर्फवृष्टी आणि निसरडया रस्त्यांमुळे बंद ठेवण्यात आली होती. दक्षिण काश्मिरच्या शोपिया जिल्ह्यातही मोठ्याप्रमाणात बर्फवृष्टी झाल्यानं मुगल रस्त्य वाहतूकीसाठी बंद करण्यात आला होता. तर श्रीनगर तसंच राज्यातल्या विविध पर्यटनस्थळांवर पर्यटक बर्फवृष्टीचा आनंद लुटताना दिसताहेत. मात्र वाहतूक विभागानं पर्यटकांना प्रवास करण्यापुर्वी रस्ते आणि महामार्गांच्या स्थिती जाणून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. बर्फवृष्टीमुळे काश्मीर विद्यापीठाच्या आज होणाऱ्या सर्व परीक्षाही पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

**हवामान**
दिल्लीसह मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेशचा आग्नेय भाग, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, चंदिगड, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये आज पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. महाराष्ट्रातही विदर्भ मराठवाडा तसंच गुजरातमधील काही भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**या बरोबरच आकाशवाणीवरील राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**